नि.क्र.१८ (1) नि.फौ.ख.क्र.४६/२०१९

शासन वि.सोमेश

**फौजदारी प्रक्रिया संहित, १९७३ चे कलम २७२ व २७७ नुसार न्यायालयीन**

**भाषा मराठीत पुरावा**

**अभियोजन पक्षातर्फे साक्षीदार क्र.०३ ची शपथेवर साक्ष**

मी शपथपुर्वक निवेदन करातो की:

माझे नावः कौशल भालचंद्र ढऊळकर,

वयः ३२ वर्षे, व्यवसायः नोकरी,

राहणारः सुडकोली, ता.रोहा, जि.रायगड.

**सरतपासणी अभियोग पक्षातर्फे विशेष सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. व्ही. एस. म्हात्रे यांच्यामार्फत :**

०१. घटनेचेवेळी मी, माझे आईवडील, भाऊ, काका काकू, आत्या असे एकत्र राहात होतो. त्यावेळी मी युनिकेम कंपनी, धाटाव रोहा येथे कार्यरत होतो. आमचे गावातील मुलांचा एकता मित्र मंडळ, सुडकोली नावाचा व्हॉटसअॅप ग्रुप आहे. दि.१८.१२.२०१८ रोजी मी सदर व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये किल्ले बिरवाडीची साफसफाई करण्याकरीता सहकार्य मिळावे या अनुशंगाने मेसेज केला होता. माझे सदरील मेसेजची आरोपीने खिल्ली उडविली. मी त्याकडे लक्ष दिले नाही.

०२. दि.२१.१२.२०१८ रोजी मी सकाळी ०७.३० वा. माझे नोकरीवर कामाकरीता गेलो व संध्याकाळी ०७.०० वा. चे दरम्यान आमचे गावातील दुर्गा माता मंदिर येथे माझी गाडी थांबविली. त्या ठिकाणी मी माझा मित्र मयुर धुमाळ याची वाट बघत होतो. त्यावेळी सोमेश धुमक व संकेत गव्हाळे मंदिराचे पायरीवर बसलेले होते. मला मंदिराचे गेटजवळ बघून आरोपींनी तुझ्यात दम असेल तर आता ये, तुला व तुझे बापाला संपविण्याची माझेमध्ये ताकद आहे असे म्हटले.

त्यावरून मी आरोपीला तु मला व माझे वडीलांना मारण्याची भाषा का करतोस असे विचारले. त्यावरून आरोपीने त्याचे हातातील स्टीलचे कडयाने माझे डोके, नाक व डाव्या गालावर वार केले आणि हाताने माझे पोटात फाईट मारली.त्यामुळे माझे डोके, नाक व डाव्या गालावर दुखापत झाली होती. आरोपीचा मित्र संकेत गव्हाळे भांडण सोडविण्याचा प्रयत्न करीत होता. परंतू, आरोपी त्याचे ऐकत नव्हता. आमचे भांडणाचा आवाज ऐकून माझे काका राजेंद्र सुतार तेथे आले. त्यांनी आमचे भांडण सोडविले. भांडण सोडविल्यानंतर आरोपीने मला तू कंपनीतून एकटा येतोस ना, मी तुला कधिही खपवून टाकीन अशी धमकी दिली. त्यानंतर माझे काकांनी मला घरी आणले. नंतर माझे वडील व काका यांनी मला तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशनला नेले. पोलीसांनी आगोदर मला वैद्यकीय उपचाराकरीता उप जिल्हा रूग्णालय रोहा येथे पाठविले. त्या ठिकाणी वैद्यकीय उपचार घेवून मी पोलीस स्टेशन, रोहा येथे परत आलो व तेथे घटनेच्या अनुशंगाने तक्रार दिली. आता मला सदर तक्रार दाखविण्यात आली. त्यावर माझी सही असून त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि.क्र.१९** देण्यात येतो.

०३. मी व्हॉटसअॅप ग्रुपवर केलेल्या चॅटींगचे स्क्रीनशॉट पोलीसांना दिले. आरोपीने मारहाण करण्याकरीता वापरलेला स्टील कडा मला दाखविल्यास मी तो ओळखू शकतो. आता मला जप्त मुद्देमाल एक स्टीलचा मनगटी कडा दाखविण्यात आला. तो तोच आहे. त्यास **वस्तू 'अ'** देण्यात येतो.

०४. मी आरोपीला ओळखतो. तो आज न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण.

**आरोपीतर्फे उलटतपास विधीज्ञ श्री. पी. एच.पाटकर यांच्यामार्फत सुरू.**

०५. हे म्हणणे खरे आहे की, सुडकोली हे गाव रोहा पासून अंदाजे २० कि.मी. अंतरावर आहे, युनिकेम कंपनी रोहा शहरापासून अंदाजे ०३ कि.मी. अंतरावर आहे. सदर कंपनीमध्ये माझी कामाची वेळ सकाळी ०८.३० ते संध्याकाळी ०५.०० अशी आहे. मला तीनही शिफ्ट मध्ये काम करावे लागत होते.

०६. दि.२१.१२.२०१८ रोजी मी युनिकेम कंपनीमध्ये कार्यरत असल्याचा पुरावा पोलीसांना दिला नव्हता. मला कंपनीमध्ये कामाकरीता ड्रेसकोड असायचा. मला कंपनीमध्ये कामावर जाण्याकरीता सकाळी ०७.३० वा. निघावे लागत होते.

०७. एकता मित्र मंडळ, सुडकोली या व्हॉटसअॅप ग्रुपमध्ये अंदाजे ३० सदस्य होती. हे म्हणणे खरे आहे की, बिरवाडी किल्ला आमचे गावापासून अंदाजे ०२ कि.मी. अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी व गावातील लोकांचे किल्ले बिरवाडीचे आगोदर आपण आपले गावाची साफसफाई करू असे म्हणणे होते.

०८. पोलीसांनी माझी फिर्याद माझे सांगण्याप्रमाणे नोंदविली. मी पोलीसांना फिर्याद देतेवेळी आरोपीने माझी खिल्ली उडविली असे सांगितले होते. आरोपीने माझी नेमकी काय खिल्ली उडविली, तो माझे फिर्यादीमध्ये नमूद नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीने ज्या मोबाईल क्रमांकावरून माझे मेसेजची खिल्ली उडविली तो फिर्यादीमध्ये नमूद नाही.

०९. प्रस्तूत गुन्ह्याचे तपासाकामी मी पोलीसांना माझा मोबाईल दिला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, आमचे गावातील दुर्गामाता मंदिर गावातील अंतर्गत रस्त्यावर आहे, सदर मंदिराचे आसपास लोकांची घरे आहेत, सदर मंदिराचे चारही बाजूने कंपाऊंड असून एक छोटे गेट दुचाकी वाहनाकरीता व एक मोठे गेट चारचाकी वाहनाकरीता आहे, सदर मंदिरामध्ये मुख्य मंदिराचा भाग त्याचेसमोर सभागृह आहे, सदर मंदिरात जाण्यासाठी तीन–चार पयऱ्या आहेत, सदर मंदिराचे आजूबाजूचा बराच परिसर मोकळा आहे, मंदिराचे पायऱ्यापासून लोखंडी गेट अंदाजे ५० फुट अंतरावर आहे, सदर मंदिरामध्ये संध्याकाळचेवेळी लोक येतात. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, घटनेचेदिवशी मंदिरामध्ये इतर कोणीही नव्हते.

१०. माझे घराजवळ मयुर धुमकचे घर आहे. हे म्हणणे खरे आहे की, दि.२१.१२.२०१८ पुर्वीपासून मयुर धुमक पेण येथे शिक्षण घेत होता. घटनेचे दिवशी मयुर धुमक आला नव्हता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, घटनेचे दिवशी मयुर धुमक दुर्गामाता मंदिराचे गेटसमोर आला नव्हता. संपूर्ण घटना होईपर्यंत मयुर धुमक मोक्यावर आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की, मी स्वतःहून मंदिराचे आतमध्ये गेलो होतो. आरोपी मला व माझे वडीलांना उद्देशून धमकी देत असताना मी मोक्यावरून निघून गेलो नव्हता. घटना अंदाजे अर्धा तास चालली. घटनेचेवेळी मी आरडाओरडा केला नव्हता. आरोपी मला मारत असताना मी तेथून पळून जाण्याचा प्रयत्न केला नाही.

११. मी मंदिरात गेल्यानंतर आरोपी व संकेत गव्हाळे माझेपासून अंदाजे ०१–०२ फुट अंतरावर होते. हे म्हणणे खरे आहे की, दुर्गामाता मंदिराला लागून

असलेल्या रस्त्याचे पुढे प्राथमिक शाळा आहे, सदर शाळेचे मागे मयुर धुमक राहतो, त्याचे घराला लागून माझे घर आहे.

१२. आरोपीने माझे डोके, नाक व गालावर प्रत्येकी एक वेळा कडे मारले होते. हे म्हणणे खरे आहे की, कड्याची बाहेरची बाजू धारदार असते. मारहाणीमुळे माझे डोक्यावर व गालावर जखम झाली होती, त्यातून रक्त निघाले होते. मी रक्त जास्त निघू नये म्हणून त्या ठिकाणी रूमाल लावला होता. माझे कपड्यांवर रक्त पडले होते. मी माझे कपडे व रूमाल पोलीसांना दिला होता. साक्षीदार स्वतःहून सांगतो की, ते त्यांनी जमा करून घेतले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझे कपडे व रूमाल पोलीसांना दिला नव्हता, ते त्यांनी जमा करून घेतले नाही.

१३. आरोपीने माझे पोटामध्ये एक फाईट मारली होती. त्यामुळे माझे पोट दुखत होते. मी वैद्यकीय उपचाराकरीता गेल्यानंतर डॉक्टरांना माझे डोके, गाल, नाक व पोटामध्ये मार लागल्याचे सांगितले होते. मला डॉक्टरांनी रात्री १०.०० वा. चे दरम्यान तपासले होते. हे म्हणणे खरे आहे की, डिसेंबर महिन्यामध्ये लवकर काळोख होतो.

प्रश्न – घटना सुरू असताना बाजूचे रस्त्यावर किती लोक जमा झाले होते?

उत्तर – घटनेनंतर मी थोडा बेशुद्ध झालो होतो. किती लोक जमा झालेले आज मला आठवत नाही.

१४. घटनेनंतर मी थोडा बेशुद्ध झाल्याचे फिर्याद देतेवेळी पोलीसांना सांगितले नव्हते. हे म्हणणे खरे आहे की, गावातील भांडणे गाव पंचांसमोर मांडली जातात, ती शक्यतोवर तेथे मिटविण्याचा प्रयत्न केला जातो.पोलीस स्टेशनला मी, माझे वडील व काका कारने गेलो होतो. त्यावेळी आम्ही रात्री ०८.०० वा. चे दरम्यान आमचे घरून निघालो होतो. हे म्हणणे खरे आहे की, सुडकोली ते रोहा

वाहनाने साधारणपणे एक तासाचे अंतर आहे. सदर कार माझे काका विकास यांची होती. ते माझेसोबत पोलीस स्टेशनपर्यंत आले होते.

१५. मला दवाखान्यात पाठवितेवेळी पोलीसांनी आमचे सोबत यादी दिली नव्हती, तसेच कोणीही पोलीस कर्मचारी पाठविला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, दि.१८.१२.२०१८ रोजी मी माझे मोबाईल फोनमधून एकता मित्र मंडळ, सुडकोली हा व्हॉटसअॅप ग्रुप डिलीट केला होता. हे म्हणणे खरे आहे की, प्रस्तूत घटनेचे अनुशंगाने पोलीसांनी माझेकडे दि.०२.०६.२०१९ रोजी पुन्हा विचारपूस केली होती.

१६. हे म्हणणे खरे आहे की, कथीत घटना संध्याकाळी ०७.०० वा. चे दरम्यान घडली होती, त्या अनुशंगाने माझी फिर्याद रात्री १२.०० वा. नोंदविण्यात आली, झालेल्या विलंबाचे अनुशंगाने स्पष्टीकरण माझे फिर्यादीमध्ये नमूद नाही.

१७. आरोपीने माझे डोक्यात कडे मारल्यानंतर मी त्याचा हात पकडण्याचा प्रयत्न केला होता. भांडण सोडविण्याकरीता आलेले काका राजेंद्र माझे वडीलांचे छोटे भाऊ आहेत. हे म्हणणे खरे आहे की, त्यांचे व्यतिरीक्त दुसरा व्यक्ती भांडण सोडविण्याकरीता आला नव्हता. घटना २१ तारखेला घडल्यानंतर दुसऱ्या दिवशी मी कंपनीमध्ये कामावर गेलो नव्हतो.

१८. हे म्हणणे खरे नाही की, आमचे गावातील मुलांचा एकता मित्र मंडळ, सुडकोली या नावाचा व्हॉटसअॅप ग्रप नाही, दि.१८.१२.२०१८ रोजी मी सदर व्हॉटसअॅप ग्रुपवर किल्ले बिरवाडी साफसफाई करण्याचे अनुशंगाने मेसेज टाकला नव्हता, माझे सदरील मेसेजची आरोपीने खिल्ली उडविली नव्हती, दि.२१.१२.२०१८ रोजी मी सकाळी ०७.३० वा. माझे नोकरीवर कामाकरीता

गेलो नव्हतो, संध्याकाळी ०७.०० वा. चे दरम्यान आमचे गावातील दुर्गा माता मंदिर येथे मी माझी गाडी थांबविली नाही, त्या ठिकाणी मी माझा मित्र मयुर धुमक याची वाट बघत नव्हतो, त्यावेळी सोमेश धुमक व संकेत गव्हाळे मंदिराचे पायरीवर बसलेले नव्हते, मला मंदिराचे गेटजवळ बघून आरोपींनी तुझ्यात दम असेल तर आता ये, तुला व तुझे बापाला संपविण्याची माझेमध्ये ताकद आहे असे म्हटले नव्हते, त्यावरून मी आरोपीला तु मला व माझे वडीलांना मारण्याची भाषा का करतोस असे विचारले नव्हते, त्यावरून आरोपीने त्याचे हातातील स्टीलचे कडयाने माझे डोके, नाक व डाव्या गालावर वार केले नव्हते, त्याने हाताने माझे पोटात फाईट मारली नव्हते, त्यामुळे माझे डोके, नाक व डाव्या गालावर दुखापत झाली नव्हती, आरोपीचा मित्र संकेत गव्हाळे भांडण सोडविण्याचा प्रयत्न करीत नव्हता, आमचे भांडणाचा आवाज ऐकून माझे काका राजेंद्र सुतार तेथे आले नव्हते, त्यांनी आमचे भांडण सोडविले नाही, भांडण सोडविल्यानंतर आरोपीने मला तू कंपनीतून एकटा येतोस ना, मी तुला कधिही खपवून टाकीन अशी धमकी दिली नव्हती, त्यानंतर माझे काकांनी मला घरी आणले नाही, नंतर माझे वडील व काका यांनी मला तक्रार देण्याकरीता पोलीस स्टेशनला नेले नाही, पोलीसांनी आगोदर मला वैद्यकीय उपचाराकरीता उप–जिल्हा रूग्णालय, रोहा येथे पाठविले नव्हते, त्या ठिकाणी वैद्यकीय उपचार घेवून मी पोलीस स्टेशन, रोहा येथे परत आलो नव्हतो, तेथे मी घटनेच्या अनुशंगाने तक्रार दिली नव्हती.

१९. हे म्हणणे खरे नाही क, माझा आरोपीसोबत चॅटींगचे कारणावरून वाद झाला होता, त्यावरून त्याचेवर दबाव टाकण्याचे उद्देशाने मी आरोपीविरूद्ध खोटी फिर्याद दिली. हे म्हणणे खरे आहे की, वस्तू ‘अ’ वरील कड्या प्रमाणे कडे

बाजारामध्ये विक्रीस उपलब्ध असते. हे म्हणणे खरे नाही की, वस्तू 'अ' वरील कड्याने आरोपीने मला मारहाण केली नव्हती, मी मोटार सायकलवरून पडल्यामुळे मला मार लागाला होता, मी सरतपासणीमध्ये सांगितल्याप्रमाणे कुठलिही घटना घडली नाही, आरोपीने मला कोणत्याही प्रकारची मारहाण केली नव्हती व धमकी दिली नव्हती, मी आज न्यायालयात खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही. श्रवणोत्तर स्विकृत,

sunil sakharam mahale
Digitally signed by sunil sakharam mahale
Date: 2023.09.05 17:17:51 +0530

स्थळ : रोहा. (एस. एस. महाले)
दि.०५.०९.२०२३ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, रोहा.